प्रशासकिय इमारत जिल्हा परिषद,वाशिम
आयएसओ 9001:2008 आयएसओ मानांकित कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,काटा रोड,वाशिम 444505
दुरध्वनी क्रमांक : 07252-232862 इमेल : dyceozpwashim@gmail.com

महत्वाचे / निरीक्षण मुद्दे

जाक्र/जिपवा/साप्रवि/रवका/प्र.मुद्दे/ 3669 /२०१८
कार्यालय जिल्हा परिषद वाशिम
दिनांक :- 8/6/18

प्रति ,

१) खाते प्रमुख ---------------------------------- -(सर्व)
जिल्हा परिषद,वाशिम.
२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती -------------------- ( सर्व )

**विषय :- मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचे कडील प्रलंबीत परिच्छेद तात्काळ निकाली काढणे बाबत.**

**संदर्भ :-** १) मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांचे दि.२४/०५/२०१८ रोजी च्या सभेतील सुचना.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,वाशिम यांचे दि.३१/०५/२०१८ रोजीच्या स.प्र.अ. व क.प्र.अ. यांच्या आढावा सभेतील सुचना.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ चे अनुषंगाने मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,अमरावती यांचे निरीक्षण पथकाने जिल्हा परिषद,वाशिम व अधिनस्त पंचायत समिती ( सर्व ) यांचे कामकाजावर केलेल्या निरीक्षण टिपणीतील प्रलंबीत मुद्यांचे अनुपालन शंभर टक्के ( १०० %) सादर करणे बाबत मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सुचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणाकडील प्रलंबित मुद्यांचे अनुपालन शंभर टक्के ( १०० %) दि. ३०/०६/२०१८ पर्यंत दोन प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावे. प्रलंबीत मुद्यांचे अनुपालन विहित नमुण्यात व पुरक दस्तऐवजांसह सादर करण्यात यावे.अनुपालन अप्राप्त असल्यास विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख म्हणुन आपणास जबाबदार ठरविण्यात येऊन आपणा विरुध्द म.ना. से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी .

**तेंव्हा सदर बाबीस प्रथम प्राधान्य देण्यात येउन आपणा कडील प्रलंबीत मुद्यांचे अनुपालन दोन प्रतीत दि.३०/०६/२०१८ पुर्वी या कार्यालयास सादर करावे, सदर बाबीस कुठल्याही प्रकारची हयगय / दिरंगाई होणार नाही याकडे खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख म्हणुन आपण स्वत: लक्ष द्यावे.**

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

**प्रतिलीपी :-** मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

३६६६

जाक्र/जिपवा/साप्रवि/रोखपाल/ /१८

कार्यालय जिल्हा परिषद,वाशिम

दिनांक :- ८/६/१८

प्रति,

१) खाते प्रमुख ---------------------------------------- जि.प.वाशिम

२) गट विकास अधिकारी पंचायत समिती -------------------- (सर्व)

३) बालविकास अधिकारी प्रा.आ.केंद्र ------------------------- (सर्व)

४) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र ---------------------------- (सर्व)

५) मुख्याध्यापक जि.प.विद्यालय ------------------------------ (सर्व)

विषय :- सशस्त्र सेना ध्वजदिन निधी दिनांक ७ डिसेंबर २०१७ संकलना बाबत.

संदर्भ :-१)या कार्यालयाचे पत्र क्र १०३९दिनांक ०७/०३/२०१८.

२) या कार्यालयाचे पत्र क्र ३०७०दिनांक ०७/०५/२०१८.

-०-०-०-०-०-०-०-०-०-

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद वाशिम करिता रुपये ८,००,०००/- उध्दीष्ट देण्यात आले आहेत.आपणास पावती पुस्तके पाठविण्यात आले आहेत.त्यानुसार आपल्या अधिनस्त कर्मचा-याकडुन माहे एप्रिल - २०१८व मे-२०१८ च्या वेतना मधुन कपात करण्यात आलेल्या धनादेश जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय वाशिम यांचे नावाने काढुन तो सैनिक कल्याण कार्यालय वाशिम यांचेकडे धनादेश जमा केल्या बाबतची पोच पावती या कार्यालयास सादर करण्याबाबत संदर्भिय क्र १ व २ नुसार कळविण्यात आलेले आहे. परंतु अदयाप पर्यंत या कार्यालयास पोच पावती प्राप्त झालेली नाही.

करिता आपणास आदेशीत करण्यात येते की, ध्वजदिन निधी चे धनादेश तात्काळ सैनिक कल्याण कार्यालयास जमा करुन पोच या कार्यालयास सादर करण्यात यावी.सदर प्रकरणी दिरंगाई झाल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद वाशिम

प्रतिलीपी :- मा.जिल्हाधिकारी वाशिम यांना माहिती करिता सविनय सादर.

मुख्य कार्यकारी अधिकारी

**तात्काळ**

**जा.क्र.जिप/साप्रवि/अंदाजशा./ ३६६५ /२०१८**
**सामान्य प्रशासन विभाग जि. प. वाशिम**
**दिनांक :- ८ /०६/२०१८**

**प्रति,**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम.**

**विषय** :- स्थानिक निधी लेखा, मा.महालेखाकार नागपुर तसेच पंचायत राज समिती यांचे कडील प्रलंबित लेखा आक्षेपाचे अनुपालन त्वरित सादर करुन मुद्दे निकाली काढणे बाबत.

**संदर्भ** :- मा.आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी दि.२४/०५/२०१८ रोजीच्या सभेमध्ये दिलेल्या सुचना.

-०-

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास याव्दारे सुचित करण्यात येते कि,मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचे अध्यक्षेतेखाली दि.२४/०५/२०१८ रोजी जिल्हा परिषद वाशिम येथे आढावा सभा आयोजित करण्यात आली होती.सदर आढावा सभमध्ये स्थानिक निधी लेखा,महालेखाकार,तसेच पंचायत राज समिती कडील दरमहा १० टक्के याप्रमाणे परिच्छेद निकाली काढण्या बाबत मा.विभागीय आयुक्त यांनी सुचना दिलेल्या आहेत.त्यानुसार प्राप्त स्थानिक निधी लेखा,महालेखाकार,तसेच पंचायत राज समिती यांचेकडील एकुण प्रलंबित परिच्छेदापैकी दरमहा १० टक्के परिच्छेद निकाली काढुन १००टक्के उदिष्ट पुर्ण करण्या बाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर करावा.

आपणास दिलेल्या उदिष्टाप्रमाणे प्रलंबित परिच्छेदाचे अनुपालन तयार करुन मुद्दे निकाली न काढल्यास आपणा विरुध्द आवश्यक ती प्रशासकिय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

तात्काळ

जा.क्र.जिप/साप्रवि/न्याया प्र./ 3६६६ /२०१८
सामान्य प्रशासन विभाग जि. प. वाशिम
दिनांक :- ८ /०६/२०१८

प्रति,

१) खाते प्रमुख ----------------------------
जिल्हा परिषद वाशिम

२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ---------------------------(सर्व)

**विषय** :- न्यायालयीन प्रकरणांचे न्यायालया नुसार अद्यावत रजिष्टरमध्ये नोंदी घेणे बाबत.

**संदर्भ** :- दि.३१/०५/२०१८रोजीच्या सभेमध्ये दिलेल्या सक्त निर्देशानुसार.

-०-

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि,दि.३१/५/२०१८ रोजी सहाय्यक प्रशासन अधिकारी /कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्या घेतलेल्या आढावा सभेमध्ये असे निदर्शनास आले कि,आपल्या कार्यालयाशी संबधीत न्यायालयीन प्रकरणांचे न्यायालया नुसार ( उच्च न्यायायाल,औद्योगीक न्यायालय,दिवाणी न्यायालय) असे तिन स्तरानुसार न्यायालयीन प्रकरणाचे अद्यावत रजिष्टर ठेवण्या आले नाही.

तरी याव्दारे आपणास सुचित करण्यात येते कि उपरोक्त तिन स्तरावरील न्यायालयातील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाचे सदर रजिष्टर मध्ये अद्यावत नोंदी घ्याव्यात.आणि दरमहा आपल्या विभागाशी संबधीत न्यायालयीन प्रकरणाच्या स्थिती बाबतचा अद्यावत अहवाल दरमहा नचुकता सामान्य प्रशासन विभागास तात्काळ सादर करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

जाक्र.जिपवा/साप्रवि/खाचौ/ ३६६५/२०१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम.
दि. ८/६/२०१८.

प्रति,

खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व),

जिल्हा परिषद, वाशिम.

**विषय :- प्रलंबित खातेचौकशी प्रकरणे एक महिन्याचे आंत पुर्ण करणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार दिनांक ३१/०५/२०१८ च्या सभेमध्ये खातेचौकशी प्रकरणांचा आढावा घेण्यात आला असता माझे असे निदर्शनास आले की, खातेचौकशी प्रकरणे तीन महीन्याचे आंत निकाली काढणे आवश्यक असतांना काही प्रकरणे दोन ते तीन वर्षापर्यंत प्रलंबित आहेत. सदर बाब गंभिर असून खातेचौकशीचे अंतिम अहवाल विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. खातेचौकशीचे अंतिम अहवाल विहीत मुदतीत सादर न केल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित रहात आहेत. त्यामुळे प्रकरणे वेळीच निकाली काढणे शक्य होत नाही. परिणामी संबंधित कर्मचाऱ्यांना दिर्घ कालावधीपर्यंत निलंबित अथवा खातेचौकशीच्या आधिन रहावे लागते. तसेच निलंबित कर्मचाऱ्यांना ७५% निलंबन निर्वाह भत्ता अदा करावा लागतो. ह्या बाबी गंभिर स्वरुपाच्या असल्याने त्या तेवढ्याच गांभिर्याने घेण्याची गरज आहे.

करीता आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, आपणांकडे तीन महिन्याचेवर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची त्वरीत चौकशी करून एक महिन्याचे आंत खाते चौकशी प्रकरण पुर्ण करण्यात यावे अन्यथा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम

३६९४
जाक्र.जिपवा/साप्रवि/खाचौ/ /२०१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम.
दि. ५/ ६/२०१८.

प्रति,

१) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व),

जिल्हा परिषद, वाशिम.

२) गट विकास अधिकारी, पं.स. - - - - - - - - - - - - -(सर्व)

३) कार्यालय प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व),

**विषय :- सेवानिवृत्ती प्रकरणे तात्काळ निकाली काढणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार दिनांक ३१/०५/२०१८ च्या सभेमध्ये सेवानिवृत्ती प्रकरणांचा आढावा घेण्यात आला असता माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे लहान-सहान त्रुटींमुळे बराच काळ प्रलंबित राहतात. त्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नाहक जिल्हा परिषदेसोबत पत्रव्यवहार करावा लागतो. तसेच त्यांना आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागते.

करीता आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, आपणांकडे प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढून पुर्ण करण्यात यावे अन्यथा आपणाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम

३६६०

जा.क्र.जिपवा/साप्रवि/आस्था १ / /१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम
दिनांक :- ८।६।१८

**प्रति,**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम

२) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम

३) खाते प्रमुख - -- - - - - - -- - - - - - - - -- - - - - - - - - - - - - - (सर्व) जि.प.वाशिम

४) गट विकास अधिकारी पं.स.- - -- -- - - - - - - - - - - - - - - - -- - - (सर्व)

५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.- - - - - - - - - --- -- (सर्व)

६) उप अभियंता जि.प.ल.सि./ग्रापापु/बांध.उप विभाग- - - - - - - - - - - - (सर्व)

७) तालुका वैद्यकिय अधिकारी -- - - - - - - - - - - - - - - -- - - --- - --- (सर्व)

८) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.- - - - - - - - - - - - - - - - - - - -- - - - - (सर्व)

९) मुख्याध्यापक जि.प.हायस्कुल - - - - - - - - - -- - - - - --- -- - - - - (सर्व)

**विषय** :- कार्यालयात वावरतांना व पत्रव्यवहार करतांना पाळावयाचे प्रोटोकॉल बाबत.

माझे असे निदर्शनास आले आहे की, कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी विभागाने निर्गमित केलेल्या परीपत्रकानुसार कामकाज करीत नाहीत. तसेच बरेच अधिकारी व कर्मचारी हे कार्यालयात वावरतांना प्रोटोकाल नुसार वागत / वावरत नसल्याचे दिसुन तसेच पत्रव्यवहार करतांना वरीष्ठांना आदरपुर्वक पत्रव्यवहार करणे आवश्यक असतांना तसे होत नसल्याचे दिसुन येत आहे.

करीता आपणास सुचीत करण्यात येते की, यापुढे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयातील प्रोटोकॉल नुसार ओळखपत्रासह वेळेवर कार्यालयत उपस्थीत रहावे, तसेच त्यांचे कडे कार्यालयीन कामकाजकरीता येणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी/ लाभार्थी यांचे सोबत सौंजन्याने वागावे. तसेच वरिष्ठांसोबत पत्र व्यवहार करतांना कार्यालयीन प्रोटोकॉल नुसार पत्रव्यवहार करण्या बाबत दक्षता घ्यावी. तसेच कार्यालयात वावरतांना वरिष्ठ अधिकारी/ कर्मचारी यांचे सोबत सौजन्याने वागण्याबाबतची दक्षता घ्यावी. जे अधिकारी/ कर्मचारी यापुढे पत्राचे अनुषंगाने कार्यवाही करणार नाहीत त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधिल तरतुदीचा भंग केला असे समजुन त्यांचे विरध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे कलम नुसार प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची कृपया गांभिर्याने नोद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

३६६३
जा.क्र.जिपवा/साप्रवि/आस्था १ / /१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम
दिनांक :- ८।५।१८

**प्रति,**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम

२) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम

३) खाते प्रमुख - -- - - - - -- - - - - - - - -- - - - - - - - - - - - (सर्व) जि.प.वाशिम

**विषय** :- अधिकारी / कर्मचारी यांचे दरमहा आढावा सभा घेणे बाबत.

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद,अंतर्गत सर्व विभाग प्रमुख हे त्यांचे अधिनिस्त असलेले अधिकारी व कर्मचारी हयांची दरमहा आढावा बैठक घेवुन राबविण्यात येत असलेल्ल्या योजनांची अद्यावत माहिती घेत नाहीत तसेंच इतर विकासात्मक बाबींचा घेत नाहीत. या बाबत वरिष्ठ कार्यालयास वेळोवेळी माहिती मागविण्यात येत परंतु विभाग प्रमुख हे नियमीतपणे आढावा घेत नसल्याने मागविलेली माहिती शासनात विहीत मुदतीत सादर करता येत नाही. त्याच प्रमाणे खाते प्रमुखांना या बाबतची सविस्तर माहिती राहत नाही.

करीता आपणास सुचीत करण्यात येते की, यापुढे सर्व खाते प्रमुख यांनी त्यांचे अधिनिस्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या दरमहरा आढावा सभा घेवुन सभेमध्ये आपले विभागाकडुन राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना तसेच इतर सर्व माहिती करीता दरमहा विभागामधिल आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांच्या बैठका घेण्यात येवुन त्यामध्ये सविस्तर विभागाचा आढावा त्या बाबतची अद्यावत माहिती सादर करण्याची दक्षता घ्यावी तसेच दरमहा होणाऱ्या सभेचे इतिवृत्त तयार करुन माझे सादर करावे. जे अधिकारी/ कर्मचारी पत्राचे अनुषंगाने कार्यवाही ी करणार नाहीत त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधिल तरतुदीचा भंग केला असे समजुन त्यांचे विरध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे कलम नुसार प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोद घ्यावी.

करीता आपले माहिती व तात्काळ कार्यवाही करीता रवाना.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

३६६३

जा.क्र.जिपवा/साप्रवि/आस्था १ / /१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम
दिनांक :- ८/६/२०१/

**प्रति,**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम

२) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम

३) खाते प्रमुख - -- - - - - -- - - - - - - - -- - - - - - - - - - - - - (सर्व) जि.प.वाशिम

४) गट विकास अधिकारी पं.स.- - -- -- - - - - - - - - - - - - - - -- - - (सर्व)

५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.- - - - - - - - --- -- (सर्व)

६) उप अभियंता जि.प.ल.सि./ग्रापापु/बांध.उप विभाग- - - - - - - - - - - (सर्व)

७) तालुका वैद्यकिय अधिकारी -- - - - - - - - - - - - - -- - -- --- - --- (सर्व)

८) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.- - - - - - - - - - - - - - - - - -- - - - (सर्व)

९) मुख्याध्यापक जि.प.हायस्कुल - - - - - - - - -- - - - - --- -- - - - (सर्व)

**विषय** :- अनधिकृत गैरहजर असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे वेतना बाबत.

उपरोक्त विषयान्वये दिनांक ३१/५/२०१८ रोजी सहाय्यक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे मासीक सभेमध्ये आढावा घेतला असता माझे असे दिसुन आले आहे की, कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन देयके दरमहा सेवार्थ / शालार्थ प्रणाली मार्फत अदायगी केली जाते. परंतु बऱ्याच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे कामावर गैरहजर असताना सुध्दा त्यांचे वेतन देयके नियमीत पणे अदा करण्यात येत आहे ही निश्चीतच वित्तीय अनियमीतता होत असल्याचे दिसुन आले.

करिता या पत्रानुसार आपणास सुचीत करण्यात येते की, या पुढे सर्व कार्यालय प्रमुख यांनी दरमहा वेतन अदायगी पुर्वी सर्व अधिनीस्त कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असल्या बाबत आढावा घेवून त्या बाबतचे प्रमाणपत्र संबधित खाते प्रमुख यांचेकडे दर महा सादर करणे बंधनकारक राहील.

ज्या कार्यालयाचे कर्मचारी उपस्थीत असल्या बाबतचे प्रमाणपत्र लेव्हल-२ कडे सादर न केल्यास कोणत्याही परिस्थीतीत त्या कार्यालयाच्या वेतन देयकास लेव्हल -२ चे अधिकारी/ कर्मचारी यांनी मंजुरी प्रदान करण्यात येवु नये, असे घडलयास या बाबत संबधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधिल तरतुदीचा भंग केला असे समजुन त्यांचे विरध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे कलम नुसार प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची कृपया गांभिर्याने नोद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

**कारणे दाखवा नोटीस**

जा.क्र.जिपवा/साप्रवि/आस्था १ / ३६५५ /१८
कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम
दिनांक :- ८/६/१८

**प्रति,**

श्री.एस. ए. खान
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
पंचायत समिती,रिसोड

**मार्फत :-** गट विकास अधिकारी पंचायत समिती,रिसोड

**विषय** :- कर्तव्यात कसुर करणे बाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक २१ /२/२०१८ नुसार कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात वावरताना पाळावयाच्या शिस्तीबाबत तसेच कार्यालयीन कामकाज करणे बाबतचे कार्यपध्दती बाबत सविस्तर कळविण्यात आलेले आहे. परंतु माझे असे निदर्शनास आले की, दिनांक ३१/५/२०१८ रोजी सहाय्यक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचे मासीक सभेमध्ये मी परिचय घेतला असता आपण विना ओखपत्राचे कार्यालयात आले असल्याचे दिसुन आले.

ज्याअर्थी आपणस परिपत्रकानुसार कळवूनही त्यानुसार आपण कार्यवाही करणे बंधनकारक असताना जानीव पुर्वक आदेशाची अवहेलना केली असल्याने आपण कर्तव्य पार पाडण्यात कसुर करीत असल्याचे दिसुन येत असुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधिल कलम ३ चा भंग केला आहे.

त्याअर्थी, आपणाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे कलम ३ व ४ नुसार प्रशासकिय कार्यवाही का करण्यात येऊ नये ? या बाबतचा खुलासा तिन दिवसांचे आत कार्यालय प्रमुखांच्या मार्फत अभिप्रायासह सादर करावा .आपला खुलासा अप्राप्त किंवा असमाधानकारक वाटल्यास वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**

**प्रतिलीपी :-**

१) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.वाशिम यांना माहीतीस्तव रवाना.
२) खाते प्रमुख ------------------------ सर्व जि.प.वाशिम यांना माहीतीस्तव रवाना.
३) गट विकास अधिकारी ---------------------- (सर्व) यांना माहीतीस्तव रवाना.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**